**श्री. टि.न. शिखरामे, कक्ष अधिकारी यांचा सक्तीचा प्रतिक्षा कालावधी " कर्तव्य कालावधी" म्हणून मंजूर करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**संसदीय कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- आस्थापना-२०१७/प्र.क्र.१७५/ पाच**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ३१ ऑक्टोबर, २०१७

**वाचा :-**

१) शासन आदेश सामान्य प्रशासन विभाग क्रमांक :- कअनि-१११७ /प्र.क्र.१०/१४ ब , दि.३१ मे,२०१७

२) कार्यालयीन आदेश गृह विभाग क्रमांक:- गृहआ -१०१७ / प्र.क्र.२३०/ आस्थापना-२ दिनांक ०७ जून,२०१७

३) शासन आदेश सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:- कअनि-१११७ /प्र.क्र.१०/ १४ ब , दि.१० जुलै,२०१७

४) कार्यालयीन आदेश संसदीय कार्य विभाग क्रमांक:-आस्थापना - ०४१७ / प्र.क्र.१३२/ पाच दि.१२जुलै,२०१७

**प्रस्तावना :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन अनुक्रमांक १ येथील शासन आदेशान्वये श्री. टि. न. शिखरामे, कक्ष अधिकारी यांची संसदीय कार्य विभागात बदली करण्यांत आली होती. त्यानुसार श्री. शिखरामे संसदीय कार्य विभागात रुजू होण्यासाठी संदर्भाधिन अनुक्रमांक २ येथील कार्यालयीन आदेशान्वये गृह विभागातून कार्यमुक्त होऊन दिनांक ०८ जून, २०१७ (मध्यान्ह नंतर) पासून या विभागात हजर झाले होते. परंतू या विभागातील श्री.सं.वा. जाधव, कक्ष अधिकारी यांची सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्रमांक १ येथील शासन आदेशान्वये बदलीने पदस्थापना वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागात करण्यांत आली होती. तथापि श्री. सं. वा. जाधव, यांनी तांत्रिक कारणास्तव त्यांची बदली रद्द करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडे विनंती अर्ज सादर केला होता. सदर अर्जावर सामान्य प्रशासन विभागाकडून कार्यवाही सुरु असल्यामुळे श्री. जाधव, कक्ष अधिकारी यांना या विभागातून कार्यमुक्त करण्यांत आले नव्हते. तसेच श्री. जाधव, कक्ष अधिकारी यांच्या बदली बाबत त्वरीत निर्णय घेण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडे वारंवार पाठपुरावा करण्यांत येत होता. तसेच दरम्यानच्या काळात या विभागातील श्री. वि. ज. ओजाळे, कक्ष अधिकारी यांनी श्री. जाधव, कक्ष अधिकारी हे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागात बदलीने जाण्यांसाठी इच्छुक नसल्यास आणि त्यांची बदली रद्द केल्यांस त्याच्या ऐवजी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागात बदली करण्यांबाबत श्री. ओजाळे यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे विनंती अर्ज सादर केला होता. सदर दोन्ही विनंती अर्जाबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून निर्णय प्रलंबित असल्यामुळे तसेच या विभागातील कक्ष अधिकारी या संवर्गातील पद रिक्त नसल्यामुळे श्री शिखरामे, कक्ष अधिकारी यांना या विभागात दि. ०८ जून, २०१७ पासून रुजू करुन घेण्यात आले नव्हते. त्यामुळे श्री. शिखरामे हे या विभागातील पदस्थापनेच्या प्रतिक्षेत राहिले.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन अनुक्रमांक ३ येथील शासन आदेशान्वये याविभागातील श्री. वि.ज. ओजाळे, कक्ष अधिकारी यांची वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागात बदली करण्यात आली आहे, त्यानुसार, संदर्भाधिन अनुक्रमांक ४ येथील कार्यालयीन आदेशानुसार श्री.ओजाळे कक्ष अधिकारी यांना वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामध्ये रुजू होण्यासाठी दि. १० जुलै, २०१७ रोजी ( म.नं ) कार्यमुक्त करण्यात आले. त्यानंतर श्री ओजाळे, कक्ष अधिकारी यांच्या बदलीमुळे रिक्त झालेल्या पदावर श्री शिखरामे, कक्ष अधिकारी यांना संसदीय कार्य विभागात दि.११ जुलै, २०१७ (म.पू ) पासून रुजू करुन घेण्यात आले आहे.

अशाप्रकारे श्री. शिखरामे, हे दिनांक ८ जून, २०१७ ते दिनांक १० जुलै, २०१७ या कालावधीत पदस्थापनेकरिता सक्तीने प्रतिक्षेत होते.याकरिता ते व्यक्तीश: जबाबदार नव्हते. ही बाब विचारात घेता श्री. टि. न. शिखरामे, यांचा उक्त दिनांक ८ जून, २०१७ ते दिनांक १० जुलै, २०१७ हा सक्तीचा प्रतिक्षा कालावधी " कर्तव्य कालावधी " म्हणून मंजूर करण्यांची बाब शासनाच्या विचाराधीन होती.याबाबत पुढील प्रमाणे शासन आदेश देण्यांत येत आहेत.

**शासन निर्णय :-**

श्री. टि.न. शिखरामे,कक्ष अधिकारी यांचा दिनांक ८ जून,२०१७ ते दिनांक १० जुलै,२०१७ हा सक्तीचा प्रतिक्षा कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा ( सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम १९८१ मधील नियम -९ (१४) (एफ) व शासन निर्णय वित्त विभाग, दिनांक ०२.०६.२००३ मधील तरतूदी नुसार " कर्तव्य कालावधी " म्हणून मंजूर करण्यांत येत आहे.

२. श्री. टि.न. शिखरामे,कक्ष अधिकारी यांना दिनांक ८ जून,२०१७ ते दिनांक १० जुलै, २०१७ या कालावधीत प्रशासकीय कारणास्तव पद स्थापनेकरीता सक्तीने प्रतिक्षेत रहावे लागले, या करीता ते व्यक्तीश: जबाबदार नव्हते.

३. श्री. टि.न. शिखरामे,कक्ष अधिकारी यांना दिनांक ८ जून,२०१७ ते दिनांक १० जुलै,२०१७ या कालावधीतील अनुज्ञेय वेतन व भत्ते अदा करण्याबाबत संबंधीत आहरण व संवितरण अधिकारी संसदीय कार्य विभाग यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

४ श्री. टि. न. शिखरामे, कक्ष अधिकारी यांचा दिनांक ८ जून,२०१७ ते दिनांक १० जुलै, २०१७ या कालावधीचा सक्तीचा प्रतीक्षा कालावधी हा "कर्तव्य कालावधी " म्हणून समजला जाण्यास सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिली आहे.

५ सदर शासन निर्णय हा वित्त विभाग, शासन निर्णय क्र. सेनिवे १००१ /१०३/ सेवा -४ दिनांक २ जून,२०१३ आणि शासन अधिसूचना क्रमांक संकीर्ण २०१५ / प्र.क्रं २७ / सेवा ६ दिनांक ०३ मार्च, २०१६ अन्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सचिवांना प्रत्यायोजित करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या अनौ. संदर्भ क्रमांक ९४/१४ ब दिनांक ६ ऑक्टोबर,२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक २०१७११०१११५९२८५०१५ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Vasudeo Jadhav

Digitally signed by Sanjay Vasudeo Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Parliamentary Affairs, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46b3ee3c307381324abb3d60d1affb2c15ed046cf0907da3bfbb5f1f0dcd3cfe, serialNumber=bbde2a625f76bd7c322ce4089756d41f788d1ab32918ef26fc2d1560fb85949c, cn=Sanjay Vasudeo Jadhav
Date: 2017.11.01 11:46:34 +05'30'

**( सं.वा. जाधव )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) १/२ महाराष्ट्र मुंबई / नागपूर.
३) निवासी लेखा अधिकारी, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पू), मुंबई.
४) रोख शाखा, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. त्यांना सूचित करण्यांत येते की, त्यांनी सदर आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांच्या सेवा पुस्तकात जोडून, आवश्यक ती नोंद घ्यावी.
५) अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/कार्या.१४-ब, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) श्री. टि. न. शिखरामे, कक्ष अधिकारी, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७) निवड नस्ती / वैयक्तिक नस्ती